# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

आंतरवासिता गट क्र ४

# आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालय, पनवेल

बी.एड.द्वितीय वर्ष, तृतीय सत्र

२०२३-२४

## भारतीय संविधानाच्या मूलभूत ११ कर्तव्यांवर आधारित विशेषांक

# आम्ही भारताचे लोक....

**प्रेरणा,प्राचार्य**
**डॉ.रमा भोसले**

**संपादिका**
**प्रा.डॉ. नीलिमा मोरे**

## संपादक मंडळ

**संपादक**

**प्रा.डॉ.नीलिमा मोरे**

**उपसंपादक**

**श्री.प्रतिक स्मिता उत्तम पवार**

**गटमुख्याध्यापक**

**सहसंपादक**

**श्रीमती प्रज्ञा धनंजय साळुंखे**

**श्रीमती कोमल केशव तिवरेकर**

**श्रीमती सावित्री नथू महाले**

**श्रीमती सायली दीपक म्हात्रे**

**श्रीमती कांचन नाना झोप**

**श्रीमती प्रतिज्ञा मोहन कोडग**

**श्री. सुरज शंकर म्हस्कर**

**श्रीमती तेजल प्रवीण कलाल**

# अनुक्रमणिका


| अनु. क्र. | प्रा. डॉ. नीलीमा मोरे | प्रस्तावना |
|---|---|---|
| ०१. | श्रीमती. कांचन नाना झोप | मूलभूत कर्तव्य क्र. ०१ |
| ०२. | श्रीमती. कोमल केशव तिवरेकर | मूलभूत कर्तव्य क्र. ०२ |
| ०३. | श्रीमती. सायली दिपक म्हात्रे | मूलभूत कर्तव्य क्र. ०३ |
| ०४. | श्रीमती सावित्री नथु महाले | मूलभूत कर्तव्य क्र. ०४ |
| ०५. | श्री.प्रतिक स्मिता उत्तम पवार | मूलभूत कर्तव्य क्र. ०५ |
| ०६. | श्री.प्रतिक स्मिता उत्तम पवार | मूलभूत कर्तव्य क्र. ०६ |
| ०७. | श्रीमती प्रज्ञा धनंजय साळुंखे | मूलभूत कर्तव्य क्र. ०७ |
| ०८. | श्रीमती कोमल केशव तिवरेकर | मूलभूत कर्तव्य क्र. ०८ |
| ०९. | श्रीमती प्रतिज्ञा मोहन कोडग | मूलभूत कर्तव्य क्र. ०९ |
| १०. | श्रीमती सावित्री नथू महाले | मूलभूत कर्तव्य क्र. १० |
| ११. | श्रीमती तेजल प्रविण कलाल | मूलभूत कर्तव्य क्र. ११ |

# प्रस्तावना

------------------------------------------------------------------------------------------------

शासकीय अध्यापक महाविद्यालय,पनवेल हे शिक्षण शास्त्राचे अध्यापन करणारे महाविद्यालय गेली अनेक दशक या कोकणच्या भूमीत देशाचे भावी शिक्षक घडवण्याचे अर्थातच ज्ञानदानाचे पवित्र कार्य करीत आहे. या महाविद्यालयाच्या २०२३-२४ या वर्षातील बी.एड द्वितीय वर्ष या वर्गाची तृतीय सत्रातील अर्थातच ११ आठवड्यांची द्वितीय आंतरवासिता दिनांक २३ ऑक्टोबर २०२३ ते २० जानेवारी २०२३ या कालावधीत पार पडली. आणि या आंतरवासिता काळात गट क्रमांक चार अर्थातच आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालय,नवीन पनवेल या विद्यालयातील छात्राध्यापकांनी तयार केलेला हा विशेषांक आपल्या हाती देताना आम्हास अत्यंत आनंद होत आहे.

आंतरवासिता काळात विषयाधिष्ठित पाठ या जबाबदारी अंतर्गत छात्राध्यापकांना विद्यालयात संस्कारक्षम आणि मूल्यधिष्ठित अशा विषयाची निवड करून शाळेत पाठ घेणे आवश्यक होते. आणि त्यासाठी आमच्या छात्राध्यापकांनी शाळेतील विद्यार्थी अर्थातच देशाचे भावी नागरिक आहेत. हे नागरिक सुजाण आणि सजग व्हावेत. त्यांना आपल्या जबाबदारी आणि कर्तव्याची जाण असावी. हा हेतू डोळ्यांसमोर धरून "भारतीय संविधानिक मूलभूत कर्तव्य" या विषयाची निवड केली. आणि त्या अंतर्गत असलेल्या ११ मूलभूत कर्तव्यांवरती छात्रा-अध्यापकांनी शाळेत पाठ घेतले. आणि नंतर त्यांनी निवडलेल्या कर्तव्यांचे निबंध लेखन स्वरूपात एकत्रिकरण करून "आम्ही भारताचे लोक " या विशेषांकाची निर्मिती झाली आहे.

हा विशेष अंक तयार करण्यासाठी आम्हा सदैव प्रेरित करणाऱ्या महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रमा भोसले मॅडम यांचे बहुमोल पाठबळ लाभले. तर गटातील सर्व छात्राध्यापकांच्या मेहनतीचे द्योतक म्हणजे हा विशेषांक आहे. हा विशेषांक त्याच्या निर्मितीमागील भूमिका येत्या काळात नक्की बजावेल या आशेसह मनःपूर्वक धन्यवाद...!

संपादिका

प्रा.डॉ. नीलिमा मोरे

## भारतीय संविधान, राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत, राष्ट्रीय गान यांचा आदर करणे.

## (मूलभूत कर्तव्य क्रमांक. ०१)

---

**श्रीमती. कांचन नाना झोप**

**हजेरी क्रमांक ४९**

---

आधुनिक काळात जागतिक पटलावर कोणत्याही देशाची ओळख किवा अस्मिता ‘राष्ट्रध्वज’ आणि ‘राष्ट्रगीत’ या दोन गोष्टींनी अधोरेखित होतात. राष्ट्रध्वज यांना तर भारतात काय किंवा जागतिक इतिहासात काय लाखो-हजारो वर्षाची परंपरा आहे. अगदी छोट्या संस्थाना पासून तर मोठ्या साम्राज्या पर्यंत प्रत्येकाचा वेगळा ध्वज आणि त्याचा अभिमान दोन्ही सोबत चालत आलेले आहे. पण राष्ट्रगीत ही १९ व्या शतकाची भेट आहे आणि तिचा एवढा प्रसार झाला की, आज जगात अस्तिवात असलेल्या ज्ञात आणि अज्ञात प्रत्येक देशाचे राष्ट्रगीत त्या त्या देशाचे मानचिन्ह आहे. या विषयी जागतिक स्तरावर नियम अलिखित पण एकदम पक्के आहेत.

प्रथम भारताचे राष्ट्रगीत ‘जन गण मन’ लिहल्या गेल्या पासुनच वादाची किनार मागे लागली आहे. ‘जन गण मन”’ हे नोबल पारितोषिक विजेते कवी, चित्रकार, लेखक, शिक्षक असे उतुंग व्यक्तिमत्व असलेले स्व. राविद्रनाथ टागोर यांनी १९११ साली लिहले आहे. त्यांनी ते इग्लंडचा राजा पंचम जार्ज यांच्या भारत भेटीच्या वेळेस त्यांच्या स्वागतासाठी त्यांचे कौतुक म्हणून लिहले आहे असे काही लोकांचे म्हणणे आहे. तर काही लोक हा गैरसमज असल्याचे सिद्ध करायचा प्रयत्न करतात. यात असलेल्या “भारत भाग्यविधाता” या शब्द रचनेमुळे हा वाद आहे. तर काहींना ‘जन गण मन’ एवजी बंकिमचंद्र चटर्जी यांनी आनंदमठ कादम्बरीत १८८२ साली लिहलेल्या ‘वंदे मातरम’ या गीताला राष्ट्रगीत बनवावे अशी इच्छा होती. कारण १८८२ पासूनच भारतीय स्वातंत्र्य सैनिकांत हे गीत कमालीचे लोकप्रिय तर झालेच पण यातील ‘वंदे मातरम’ आणि ‘भारत माता कि जय’ हा तर भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनातील जयघोष पण झाला होता. अनेक क्रांतिकारक ‘वंदे मातरम’

असा जयघोष करत एक तर फासावर लटकले किंवा इंग्रज सैनिकांच्या गोळ्यांना बळी पडत अमर झाले, तर कॉंग्रेसची एकही सभा या दोन घोषणे शिवाय होत नव्हती.

कोणत्याही देशाची ओळख किवा अस्मिता 'राष्ट्रध्वज' आणि 'राष्ट्रगीत' या दोन गोष्टींनी अधोरेखित होतात. राष्ट्रध्वज यांना तर भारतात काय किंवा जागतिक इतिहासात काय लाखो-हजारो वर्षाची परंपरा आहे. अगदी छोट्या संस्थाना पासून तर मोठ्या साम्राज्या पर्यंत प्रत्येकाचा वेगळा ध्वज आणि त्याचा अभिमान दोन्ही सोबत चालत आलेले आहे. पण राष्ट्रगीत ही १९ व्या शतकाची भेट आहे आणि तिचा एवढा प्रसार झाला की, आज जगात अस्तित्वात असलेल्या ज्ञात आणि अज्ञात प्रत्येक देशाचे राष्ट्रगीत त्या त्या देशाचे मानचिन्ह आहे. या विषयी जागतिक स्तरावर नियम अलिखित पण एकदम पक्के आहेत. प्रत्येक देशाच्या राष्ट्रगीताला योग्य तो सन्मान प्रत्येक देश त्या त्या वेळेला देत असतो.

'वंदे मातरम' गीत १८९६ मध्ये रवींद्रनाथ टागोर यांनी कॉंग्रेसच्या अधिवेशनात म्हंटले. १९०५ मध्ये इग्रजांनी 'वंदे मातरम' या गीतावर बंदी पण आणली. तरी १९१५ पासून हे गीत नियमित आणि आग्रहपूर्वक कॉग्रसेच्या प्रत्येक कार्यक्रमात सर्व धर्माचे लोक एकदिलाने गाऊ लागले. या काळात 'वंदे मातरम' हे गीत भारतीय जनतेचे "राष्ट्रगीतच" बनले होते. पण १९२१ मध्ये कॉंग्रेस पक्षाने 'खिलापत चळवळीला' पाठींबा दिला आणि 'वंदे मातरम' चे भाग्य पालटले. या खिलापत चळवळीमुळे भारतातील इस्लामी धार्मिक कट्टरतावाद वाढला आणि त्याचे परिणाम एवढ्या विकोपाला गेले की आतापर्यंत लोकप्रिय आणि सगळ्या धर्माचे लोक ज्या घोषणा आणि गीत एकदिलाने म्हणायचे त्यांना मूर्ती पूजक गीत आणि घोषणा म्हणून विरोध होऊ लागला. याचे पर्यावसन म्हणून १९२३ साली कॉंग्रेस अधिवेशनात तत्कालीन कॉंग्रेस अध्यक्ष महमद अली जिन्ना यांनी इस्लाम विरोधी घोषित केले आणि याचे गायन बंद करायची मागणी केली. या माग पुन्हा ऐरणीवर आला. मात्र तत्कालीन राष्ट्रपती राजेद्रप्रसाद यांच्या पुढाकाराने 'वंदे मातरम' च्या पहिल्या दोन कडव्याना राष्ट्रगीताचा दर्जा दिल्या गेला.

आणि ते कर्तव्य निभावण्यात भारतीय कधी कमी पडणार नाही याची खात्री असल्यानेच कदाचित संविधानाच्या संसदीय समितीने या करता मार्गदर्शक नियम दिले तरी कायद्याचे आवरण त्याला दिले नाही. याचाच फायदा अजारक अभिव्यक्तीचे कैवारी आणि इस्लाम धर्माभिमानी घेत आहेत.या मार्गदर्शक तत्वांमध्ये राष्ट्रगीत कुठे वाजवायचे आणि ते सुरु असताना कसे उभे राहायचे याचे स्पष्ट निर्देश या नियमात दिले आहेत, त्यात राष्ट्रगीत सुरु झाल्यावर सावधानमध्ये उभे राहायचे स्पष्ट निर्देश आहेत. त्यात फक्त बदल इतकाच केलाय की कोणत्याही कलाकृतीत कथेच्या ओघात

राष्ट्रगीत किंवा त्याची धून दाखवण्यात किंवा ऐकवण्यात येत असेल तर सावधानमध्ये उभे राहायची गरज नाही.

निदान वर्तमानपत्र, वृत्त वाहिन्या मधील बातमीने तरी हाच मुद्दा समोर आणला आहे. मित्रांनो, मुळातच खरा मुद्दा हाच आहे! राष्ट्रगीत कुठे वाजवायचं? का वाजवायचं? किती वेळ वाजवायचं? हा मुद्दाच नाही आहे. खरा मुद्दा हा आहे की, राष्ट्रगीत सुरु असताना आम्ही राष्ट्रगीताच्या सन्मानार्थ उभे का राहायचं? आणि आम्ही "उभे" नाही राहिलो म्हणून तो "गुन्हा" होतो का? मात्र तोच धागा पकडून माननीय न्यायालय अजून पुढे जाऊन असे पण त्याच बरोबर धार्मिकतेच्या मुद्यावर राष्ट्रगीताच्या वेळेस उभे न राहणे पण तितकेच अयोग्य आहे. कारण हा फक्त भावनेचा आणि अस्मितेचा प्रश्न नसून आपल्या राष्ट्रीय कर्तव्याच्या जाणीवेचा पण प्रश्न आहे. बाकी वैचारिक बांधिलकी आणि लिबरल याच्या विचाराखाली उभे राहण्यास नकार देणारे डावे हे भारताच्या विचारधारेशी कधी एकरूप झालेचं नाहीत.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर घटना विरोधी असल्याचा सतत आरोप करत आणि संघ शाखेत कधी राष्ट्रध्वज लावत नाही म्हणून संघाला दुषणे देणारे आणि स्वत: किती संविधानाचा आदर करतात याची जंत्री देणारे डावे, स्वतः खुलेआम राष्ट्रगीताला आदर देत नाही ही वस्तुस्थिती आहे. या प्रकरणात राष्ट्रगीता करता उभे न राहिल्यामुळे ज्यांच्यावर कारवाई झाली ते डाव्या विचारांचे लोक होते. त्यात संघाचा किंवा हिंदुत्व वादी पकडला गेला नाही यातच सगळ आल. काहींना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा 'जन गण मन' या राष्ट्रगीताला विरोध असताना त्यांनी या बाबत घेतलेली भूमिका हास्यास्पद वाटत आहे. पण मुळातच संघाने किवा संघ परिवारातील सदस्याने राष्ट्रगीताचा जाणून अपमान केलेला अजून तरी बघण्यात आला नाही. आता विचार तुम्हाला करायचा आहे की संवैधानिक आणि संपूर्ण लोकशाही पद्धतीने देशाने स्वीकारलेल्या राष्ट्रगीताला उभे राहणे ही सक्ती आहे का? आणि उभे न राहणारे देशद्रोही नाही काय? पुन्हा एकदा सांगतो की मुद्दा हा नाहीच की, राष्ट्रगीत कुठे वाजवायचे... मुद्दा हा आहे की तुमच्या राष्ट्रगीताला आम्ही मान का द्यायचा.

## भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील उदात्त आदर्शांचे पालन

## (मूलभूत कर्तव्य क्रमांक ०२)

---

**श्रीमती. कोमल केशव तिवरेकर**

**हजेरी क्रमांक ४४**

---

१९२०मधील स्वराज्य संघर्षाच्या शेवटच्या टप्प्यात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने महात्मा गांधी यांच्या अहिंसा आणि सविनय कायदेभंगाच्या धोरणाचा अवलंब केला. रवींद्रनाथ टागोर, सुब्रमण्यम भारती आणि बंकिमचंद्र चटोपाध्याय यांसारख्या अनेक विचारवंतांनी देशभक्तीची भावना जनमानसात पसरवली. तर सरोजिनी नायडू, प्रीतिलता वड्डेदार आणि कस्तुरबा गांधी यांसारख्या महिला नेत्यांनी महिलांना स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहन दिले. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजातील वंचित घटकांना मदत केली.

तर काही नेत्यांनी सशस्त्र क्रांतीचा अवलंब केला. सशस्त्र क्रांती विशेषतः रौलेट कायद्यानंतर लोकप्रिय झाली. या कायद्याने लोकांना अनिश्चित काळासाठी तुरुंगात डांबण्याची परवानगी ब्रिटिश सरकारला परवानगी दिली होती. या कायद्याविरोधात संपूर्ण भारतभर विशेषतः पंजाब प्रांतात निषेध झाला. पंजाबमधील जालियनवाला बाग हत्याकांडाद्वारे ब्रिटिशांनी हे आंदोलन हिंसकपणे दडपले. भगतसिंग, शिवराम राजगुरू, सुखदेव थापर, चंद्रशेखर आझाद आणि सुभाषचंद्र बोस यांसारख्या क्रांतिकारकांनी काँग्रेसच्या निष्क्रियतेमुळे निराश होऊन हिंसक मार्गांचा अवलंब सुरू केला. बोस यांनी अक्षीय शक्तींशी स्वतःला प्रसिद्धी दिली आणि आझाद हिंद सेनेची स्थापना केली.

समाजजीवनामध्ये जेव्हा एखादा विचार किंवा एखादी विचारसरणी रुजते किवा रुजवावी लागते, तेव्हा तो विचार किंवा ती विचारसरणी मूल्यनिरपेक्ष असून चालत नाही. ती मूल्यसापेक्ष असावी लागते. उपयुक्त अशा जीवनमूल्यांना उभारी देणारी वैचारिकता निर्माण झाली तरच ती व्यक्ती व समाजाला उभारी देऊ शकते. आणि जी मूल्ये कालबाह्य होत जातात त्यांच्या ठिकाणी कालसमांतर व कालोचित मूल्ये निर्माण करण्याचे व ती जनमानसात रुजविण्याचे

कार्य विचार- वंतांना करावे लागते. आणि म्हणून समाजाला व समाजातील विविध संस्थांना योग्य अशा मार्गावर चालण्याचे मार्गदर्शन विचारवंतांकडून अपेक्षित असते. समाज- जीवनाच्या गाड्याला कालसंगत व मूल्यसापेक्ष विचारांचे व डोलस श्रद्धांचे वंगण पुरविण्याचे काम प्रज्ञावंतांनी करणे आवश्यक असते.

सामाजिक बांधीलकीच्या भावनेने विविध प्रश्नांचे सत्यान्वेषी विश्लेषण करणारा आणि त्या प्रश्नांची उत्तरे शोधणारा विचारवंत हा खरे तर सामान्य जनांचा मार्गदर्शक, मित्र व तत्त्वज्ञ असतो. समाजजीवनाला " स्थितिशील " न बनविता " स्थैर्य " देण्याचे; तसेच " दिशाहीनते "ला प्रोत्साहन न देता त्याला "परिवर्तनशोल" बनविण्याचे सामर्थ्य ज्या विचार आणि मूल्यांतून मिळेल त्या विचार व मुल्यांचेच समर्थन करण्यासाठी विचारवंतांनी आपली प्रज्ञा पणाला लावली पाहिजे. आणि हे कार्य योग्यप्रकारे करायचे अगेल तर विचारांची इष्ट-अनिष्टता ओळण्याची बुद्धी विचारवंतांच्या जवळ असणे आवश्यक आहे. पण याउलट विचारवंतच जर कालबाह्य परंपरांना व मूल्यांना कवटाळून वसले तर समाजप्रबोधनाबी प्रक्रिया मंदावते आणि प्रसंगी मावळतेही. आणि म्हणून विचारवंतांवर एक मोठे सामाजिक दायित्व असते. या दायित्वाची जाणीव सातत्याने उरी बाळगणाऱ्या बुद्धिवादी वर्गाची (Intelligentsia) अनिवार्यता व महत्त्व राज्यकर्त्यांच्या लक्षात आले तर राष्ट्रीय जीवन प्रवाहपतित बनू शकत नाही. या दायित्वाची जाणीव प्रथमतः बुद्धिवादी वर्गालाच असणे आवश्यक आहे. आपल्या जबाबदारीची जाणीव असणारा बुद्धिवादी वर्ग हा समाजात वैचारिक "जागर" घालीत असतो. समाज जागा ठेवण्यासाठी त्याला वैचारिक "गस्त " घालावीच लागते. Eternal vigilance is the price of liberty. चिरंतन जागरूकता दाखवल्याशिवाय स्वातंत्र्याचे रक्षण करता येत नाही. सबंध समाजातच अशा प्रकारची जागरूकता निर्माण करावी लागते. आणि हे काम लोकशिक्षणाच्या माध्यमातून करणे आवश्यक ठरते.

वस्तुतः लोकशिक्षणाची जबाबदारी ही समाजानेच विचारवंतांवर सोपवलेली असते. "शाहणे करून सोडावे सकळ जन ", हा समर्थ रामदासांचा उपदेश बुद्धि- मंतांच्याचसाठी आहे. जनसामान्यांमध्ये जाणीवजागृती निर्माण करणे हे लोकशिक्ष- णाचे प्रमुख उद्दिष्ट असते आणि असले पाहिजे. जाणीवजागृती हीच लोकशिक्षणाची व प्रबोधनाची फलनिष्पत्ती असते आणि असली पाहिजे. सामान्य लोकांच्या मनात सामाजिक जाणिवा निर्माण करता आल्या तर ज्ञानाची कवाडे त्यांना उघडता येतोल आणि विवेकशक्तीच्या वाटाही त्यांना सहजपणे सापडतील. त्यांच्या हातात जीवनव्यवहाराच्या तत्त्वज्ञानाचे पाठ्यपुस्तकच त्यामुळे पडेल. शेवटी " तत्त्वज्ञान " म्हणजे तरी काय ? बरट्रेंड रसेलच्या शब्दांत सांगायचे झाले तर, " तत्त्वज्ञान " म्हणजे " विवेकाची आसक्ती ", अशी त्याची व्याख्या करता येईल.

अशाप्रकारे भारतीय संविधानातील विविध मूलभूत कर्तव्यांचा विचार करताना हे दुसरे आणि अतिशय महत्त्वाचे मूल्य विसरून आपल्याला चालणार त्यामुळे आपल्या देशाचे समाजातील स्थान कायम टिकून राहील.

**भारताचे सार्वभौमत्व, एकता आणि अखंडता अबाधित राखणे.**

**(मूलभूत कर्तव्य क्रमांक. ०३)**

---

**श्रीमती. सायली दिपक म्हात्रे**

**हजेरी क्रमांक- २५**

---

समाजातील किंवा देशाच्या नागरिकांनी समाजप्रती व देशाप्रती काही महत्त्वपूर्ण जबाबदारीच्या पार पाडाव्या व्यक्तींनी ह्याच जबाबदाऱ्या या किंवा कर्तव्याची मोठी घटना यात आली आहे. मूलभूत हक्क , राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे आणि 'मूलभूत कर्तव्ये' हे भारतीय राज्यघटनेचे विभाग आहेत जे राज्यांच्या नागरिकांप्रती मूलभूत कर्तव्ये आणि राज्यासाठी नागरिकांचे अधिकार विहित करतात. हे कलम भारतीय संविधान सभेने 1949 च्या दरम्यान विकसित केलेल्या संविधानाचे महत्त्वाचे घटक मानले जातात.देशभक्तीच्या भावनेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि भारताची एकता टिकवून ठेवण्यासाठी सर्व नागरिकांची नैतिक कर्तव्ये म्हणून मूलभूत कर्तव्यांची व्याख्या केली जाते. मूलभूत अधिकारांचा उद्देश वैयक्तिक स्वातंत्र्य आणि सर्वांच्या समानतेवर आधारित लोकशाही तत्त्वे जतन करणे आहे. समाजाचे सदस्य. डॉ. आंबेडकर म्हणाले की कायदेमंडळाची जबाबदारी केवळ मूलभूत अधिकार प्रदान करणे नाही तर त्यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे त्यांचे रक्षण करणे

संविधान निर्मात्यांनी अतिशय कष्टाने देश घडविण्यासाठी निर्माण केलेल्या भारतीय संविधानाचे पावित्र्य जपणे म्हणजे संविधानिक मूल्यांचे आचरण करणे होय. आचरण म्हणजे निस्वार्थीपणे कर्तव्ये व जबाबदारी पार पाडावी लागते. संविधानात नागरिकांच्या मूलभूत हक्क व अधिकाराचा अंतर्भाव आहे. संविधानाच्या प्रास्ताविकेत समाविष्ट आहे की, स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, राष्ट्रीय एकता व एकात्मता, धर्मनिरपेक्षता, समाजवाद, लोकशाही, गणराज्य प्रस्थापित करायचे आहे. संविधानाचा हा निश्चय व निर्धार नागरिक कर्तव्य पार पाडल्याशिवाय पूर्णत्वास येऊ शकत

नाही. हक्क आहेत तर सोबतच कर्तव्येही आहेतच. हक्क व कर्तव्य एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. देशाच्या नागरिकांनी हक्क व अधिकाराबाबत जागरूक व सतर्क असने कर्तव्यपालनाची जाणीव ठेवणे आवश्यक आहे.

भारताची सार्वभौमकता, एकता व एकात्मता उन्नत राखणे, त्यांचे संरक्षण करणे. आवाहन केले जाईल तेव्हा देशाचे संरक्षण करणे व राष्ट्रीय सेवा बजावणे. धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदांच्या पलीकडे जाऊन अखिल भारतीय जनतेमध्ये एकोपा व भातृभाव वाढीस लावणे, स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करणे

मूलभूत हक्क ही भारतीय संविधानातील मूलभूत अधिकारांची सनद आहे. ही सनद भारतीयांना भारतीय नागरिक म्हणून त्यांचे आयुष्य शांतता व समानतेने व्यतीत करण्याचे नागरी अधिकार प्रदान करते. या मूलभूत हक्कांमध्ये कायद्यापुढे समानता, उच्चार आणि अभिव्यक्ति-स्वातंत्र्य, शांततेने कोठेही उपस्थित राहण्याचे व सभा स्वातंत्र्य, आणि नागरी हक्कांच्या संरक्षणासाठी संवैधानिक प्रतिकारासाठी यासारख्या याचिकांचा अधिकार, उदारमतवादी लोकतांत्रिक देशांमध्ये असलेल्या अधिकारांचा समावेश होतो. या अधिकारांचा भंग केल्यास न्यायालयाच्या विवेकानुसार भारतीय दंडविधान संहितेखाली शिक्षा होऊ शकते. मूलभूत मानवी अधिकाराखाली भारतीय नागरिकाच्या व्यक्तिमत्त्वाच्या योग्य आणि मैत्रीपूर्ण प्रगतीसाठीचे हक्क अशी भारताच्या मूलभूत हक्कांची व्याख्या केली जाऊ शकते. हे हक्क संपूर्ण जगात वंश, जन्माचे ठिकाण, धर्म, जात, संप्रदाय, रंग, लिंग यांत भेदभावाशिवाय सर्व नागरिकांना लागू आहेत. काही बंधने वगळता हे अधिकार न्यायालयाद्वारे सर्व ठिकाणी लागू आहेत.

# देशसेवा

## (मूलभूत कर्तव्य क्र. ०४)

----------------------------------------------------------------------------------------------------

**श्रीमती सावित्री नथु महाले**

**हजेरी क्रमांक २२**

----------------------------------------------------------------------------------------------------

समाजसेवा हीच देशसेवा म्हणणे सोपे असले तरी, सेवा करणे ही सर्वांसाठी साधारण कार्य नाही, हे अतुलनिय कार्याचा मनापासुन विचार करायला हवा पण, सर्वांसाठी नाही. कित्येक जण आपले व आपल्या परिवाराचे पालन, पोषण कसे करायचे या विवंचनेत असतात. मानव जन्माला आला की, जगण्यासाठी कमवतो आणि पोटाचा अग्नी शमवतो, या शारीरिक क्रिया चालू असल्या तरी मनाने कुठेतरी दैवी शक्तीच्या अधीन जावून प्रार्थना करत असतो. भाव शोधण्याचा प्रयत्न करत असतो. आणि निसर्गाला काही अंशी देव मानू लागतो. काही चमत्कारावर विश्वास ठेवत असतात, परंतु शिक्षणामुळे विज्ञानाच्या प्रगतीमुळे मानव प्रगतीशिल झाला त्याला समजायला लागले आहे, काय खरं व काय खोटं, मानव कसा निर्माण झाला. ही सृष्टी, पशु पक्षी चराचर जीव जंतु ईथे असलेलं चैतन्य हे अद्भुत शक्ती याला सर्व नतमस्तक होतांना दिसतात.

विज्ञानाने मनुष्याच्या पंखात कितीही बळ आणले तरी एक अनामिक भिती हृदयात कुठेतरी लपून बसलेली असते. आपल्या आत्मवृंदाना काही झाले तर लगेच देवाचा धावा करत असता आणि वेगवेगळ्या रूपात त्याला आपण पाहण्याचा प्रयत्न करत असतात. भारतीय संस्कृतीमध्ये तर ईश्वराला खुप मोठे स्थान आहे. महत्त्व आहे. आणि मग त्याच्या प्राप्तीसाठी पुजा-आर्चना, उपास-दान धर्म, नामस्मरण अशा विविध प्रकाराने ईश्वराची भक्ती करत असतात. या श्रध्देमुळे त्यांना समाधान व आनंद प्राप्त होतो परंतु जे या देशाला च आपले कुटुंब पकडून चालतात तीच खरी देशभक्ती म्हणजेच देशसेवा म्हणता येईल

ज्या प्रमाणे देशाचे सैनिक हे आपल्या देशाचे रक्षण करतात त्याच प्रमाणे डॉक्टर हे आपल्या आरोग्याचे रक्षण करतात. म्हणून आपल्या समाजात डॉक्टरांना आदराने पाहिले जाते आणि त्यांना विशेष स्थान देखील आहे.

**डॉक्टर**

**जन सेवा हीच ईश्वरसेवा**

**व्रत हे ज्याने अंगिकारले**

**निस्वार्थ भावाने करी रुग्ण सेवा**

**जग हे त्यास**

**डॉक्टर संबोधते...**

डॉक्टरांना सर्वात जास्त उच्च दर्जा दिला जातो. असे म्हटले जाते की देव आणि डॉक्टर हे दोघे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. परंतु आजच्या व्यावसायिक युगात डॉक्टर आणि रुग्ण यांच्यात व्यावहारिक नाते निर्माण होऊ लागले आहेत.

डॉक्टरांचे सरावात महत्वाचे कार्य म्हणजे - रोगांचे निदान करणे. जेव्हा आपण आजारी पडतो तेव्हा सर्वात पहिले डॉक्टर जवळ जातो. कारण अनेक वेदना आणि अन्य आजार दूर करण्यासाठी डॉक्टर महत्वाचे असतात. डॉक्टरांना जीवन रक्षणकर्ता मानले जाते. कारण आपल्या दैनंदिन जीवनात आपल्याला अनेक आजारांचा सामना करावा लागतो. म्हणून हे आजार दूर करण्यासाठी आणि त्यांचे निराकरण करण्यासाठी आपल्याला डॉक्टरांची मदत घ्यावी लागते.

त्यामुळे डॉक्टरांना 'जीवन रक्षक' म्हणतात. डॉक्टरांना कित्येक वर्ष वैद्यचीय शास्त्राचा अभ्यास करावा लागतो. एकदा त्यांना या क्षेत्राबद्दल व्यावहारिक ज्ञान आणि सिद्धांतिक मिळाल्यानंतर ते कोणतेही कार्य हाताळण्यासाठी प्रशिक्षण घेत असतात.

असा प्रत्येक नागरिक जो की देशासाठी काही ना काही कोणत्या ना कोणत्या रूपात मदत करत असतो त्याला देशसेवा असे म्हणतात. आपल्या देशाचे संरक्षण करण्यासाठी जेव्हा सैनिक आपला जीवाची परवा न करता सीमेवर लढत असतात ती देशसेवा, डॉक्टर स्वतःचा व त्याच्याच कुटुंबाचा विचार न करता इतर रुग्णांचा निस्वार्थपणे इलाज करतात त्याच देशसेवा म्हणतात, शिक्षक प्रत्येक नागरिकाला त्याचे भविष्य उज्वल करण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतीने मार्ग दाखवण्याचा प्रयत्न करतो त्याला मार्गदर्शन करून पुढे नेतो त्याचे भविष्य उज्वल करतो त्यास देशसेवा असे म्हणतात,

आणि ये देशातील प्रत्येक तो व्यक्ती देशसेवाक म्हणता येईल जो लहान - मोठ्या गोष्टीची नागरिकांना मदत करतो ते सर्व व्यक्ती देशसेवाक आहेत.

## मी प्रथमतः भारतीय आणि अंतिमतःही भारतीय..

## (मूलभूत कर्तव्य क्रमांक ०५)

---

**श्री.प्रतिक स्मिता उत्तम पवार**

**हजेरी क्रमांक ३१**

---

**"जरी अनेक आपूले धर्म**

**जरी अनेक आपल्या जाती**

**परि अभंग असू द्या सदैव आपूली**

**माणुसकीची नाती"**

भारतीय संस्कृतीचा, वैविध्यतेचा विचार करता या वरील ओळी भारत देशाच्या एकसंघतेसाठी किती आवश्यक आणि किती समर्पक ठरतात हे वेगळं सांगायला नको. कारण मुळातच जाती,धर्म, भाषा,संस्कृती परंपरा या सर्वांनी नटलेला असा हा भारत देश. आणि हेच वैविध्य या भारत देशाची जागतिक ओळख बनत आहे. आणि म्हणूनच विविधतेतून एकता याचे समर्पक उदाहरण जर कोणतं असेल तर ते म्हणजे आपला भारत देश. मग हेच जागतिक उदाहरण अबाधित रहावं.आणि या देशातील कोणत्याही धर्माच्या,जातीच्या, पंथाच्या व्यक्तीला एक भारतीय म्हणून एकसंघ राहता यावं यासाठी भारतीय संविधानिक कर्तव्यामध्ये काही महत्वपूर्ण मूल्यांची नेमणूक करण्यात आली आहे. ज्यात देशातील धार्मिक भाषिक,प्रादेशिक,वर्गरहित व भेदरहित भारत निर्माण करणे अशी अपेक्षा भारतीय संविधान व्यक्त करते.भारतीय म्हणून जन्माला आलेल्या प्रत्येक व्यक्तीला एका समान पातळीवर आणून, देशाच्या विकासाच्या प्रवाहात त्याचे योगदान अधोरेखित करणे यासाठी भारतीय संविधान मदत करते. त्यातून हक्क ,अधिकार यांबरोबरच कर्तव्यांचाही समावेश होतो. आणि त्यासाठी भारतीय संविधान भारतातील प्रत्येक

व्यक्तीला ११ मूलभूत कर्तव्यांचे पालन करण्याची जबाबदारी सुद्धा देते. त्यातीलच पाचवे आणि अत्यंत महत्त्वाचे कर्तव्य म्हणजे " धार्मिक भाषिक प्रादेशिक वर्ग रहित व भेद रहित भारत निर्माण करणे आणि स्त्रियांना प्रतिष्ठा प्राप्त करून देणे."

भारत देश हा मुळातच धर्मनिरपेक्ष देश आहे. या देशाचा कोणताही एक अधिकृत धर्म नाही. आणि या देशातील प्रत्येक व्यक्तीला त्याच्या धर्माचे आचरण करण्याचा अधिकार या देशाचे सर्वोच्च संविधान बहाल करते. हिंदू, मुस्लिम, सिख, ईसाई, बौद्ध, जैन यांसारख्या विविध जाती धर्माचे लोक या देशांमध्ये अगदी गुण्यागोविंदाने नांदतात. त्यांच्या त्यांच्या धर्माचे पालन करतात. आणि इतरांच्या धर्माचा ही आदर करतात. अगदी हीच अपेक्षा भारतीय संविधान भारतीय नागरिकांकडून करते. त्याचबरोबर या देशात विविध भाषा बोलणारे आणि बोलीभाषा बोलणारी लोक सुद्धा राहतात.ज्यात मुख्यत्वे मराठी, गुजराती,पंजाबी,बंगाली,हिंदी तमिळ,इत्यादी असंख्य भाषांचा समावेश आहे. आणि या मुख्य भाषांबरोबरच या भाषांतील बोलीभाषांचा सुद्धा समावेश होतो. जी भाषा लोकांच्या रोजच्या व्यवहाराची आहे, जगण्याची भाषा आहे. आणि आपल्या दैनंदिन व्यवहाराच्या भाषेचे अवलंबन करण्याचे स्वातंत्र्य भारतीय संविधान देते.

उदा. मराठीमधील मालवणी, आगरी, बंजारा, कोळी,कोकणी इ. भाषांचा समावेश होतो.

कोणत्याही भाषेला तुच्छ न लेखता प्रत्येक भाषेचे अनन्यसाधारण महत्त्व स्वीकारून ती जिवंत ठेवण्यासाठी आणि ती व्यवहारात आणण्यासाठी सुद्धा भारतीय संविधान अनेक तरतुदी करते. इथल्या कोसाकोसावर पाणी आणि वाणी बदलते. पण हे बदलणारे पाणी आणि वाणी भारताच्या एकतेला चवदारच ठेवते. जवळपास १४० करोडची लोकसंख्या असलेला हा देश विविध प्रदेश आणि राज्यांमध्ये विभागला गेलेला आहे. यातील राज्यांची रचना भाषावर झाली. आणि त्यातून मग प्रदेशांची निर्मिती झाली. राज्यकारभार सुरळीत चालावा म्हणून या प्रशासकीय व्यवस्थेची रचना करण्यात आल्या. परंतु ही रचना आपल्या भारतीयत्वाच्या आड येऊ नये यासाठी ही प्रत्येक भारतीयाने कटिबद्ध राहणे आवश्यक आहे. आपला जन्म ज्या भूमीत झाला ती भूमी वंदनीय आहेच. पण त्याचबरोबर या सर्वांच्या पुढे जाऊन राष्ट्रीयत्व हे देशाच्या विकासासाठी आणि ऐक्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. आणि म्हणूनच धर्माचे, भाषेचे, प्रदेशाचे आणि वर्गाचे बंधन झुगारून कोणताही भेद न करता भारतीयत्व या एका छत्राखाली एकत्र येणे अत्यंत गरजेचे आहे.

आपला देश आणि या देशाची संस्कृती स्त्रियांचे पूजन करणारी आहे. पण त्याच बाजूला मनुस्मृती सारख्या विषारी परंपरेतून स्त्रियांना दुय्यमत्व बहाल करणारी व्यवस्था सुद्धा याच देशात आहे. परंतु ही व्यवस्था नाकारून स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने संधी प्राप्त करून देण्यासाठी

भारतीय संविधान महत्त्वाची भूमिका बजावते. स्त्रियांना शिक्षणात समान संधी,कामाच्या ठिकाणी समान संधी, समान वेतन, समान वारसा हक्क,न्यायात समान संधी आणि सामाजिक प्रतिष्ठेतही समान संधी बहाल करणे. आणि त्यासाठी सदैव प्रयत्नशील असणे हे भारतीय संविधानाने या देशाला दिलेले मूलभूत कर्तव्य आहे.

दीडशे वर्षांची इंग्रजांची गुलामगिरी झुगारून आणि अनेक परकीय आक्रमणे बाजूला करून, राजेशाही व्यवस्थेला कायमची मूठमाती देऊन या देशात संविधानाने लोकशाहीचे तत्व रुजवले. आणि हे लोकशाहीचे तत्व अबाधित ठेवून कोणताही भेद न करता समता समानता या तत्त्वाखाली या देशातील प्रत्येक नागरिकाला एकत्र आणणे हेच या मूलभूत कर्तव्यांचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

## **भारताच्या सुवर्ण मुकुटातील शिरोमणी...**

## **(मूलभूत कर्तव्य क्रमांक ०६)**

---

**श्री.प्रतिक स्मिता उत्तम पवार**

**हजेरी क्रमांक ३१**

---

आपल्या भारत देशाची रचना, संरचना, वैविध्यता आणि भविष्यकालीन गरज ओळखून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी लिहिलेल्या काही ओळी आवर्जून आठवतात.

**"या भारतात बंधुभाव**

**नित्य वसु दे**

**दे वरची असा दे"**

विविधतेने नटलेला आणि संस्कृती प्रधान असलेला आपला देश.या देशामध्ये बंधूभाव, प्रेम, सलोखा अखंडित रहावा यासाठी मागणी करणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आम्हाला या देशातील एकतेचे द्योतक वाटतात. कारण विविध जाती, धर्म, भाषा, पंथ, वर्ण अशा विविध प्रकारातील लोक या देशात आजही गुण्यागोविंदाने राहतात.

मनुष्य हा मुळातच समाजप्रिय आणि समाजशील प्राणी आहे. तो समाजातच जगतो,घडतो,वावरतो. आपल्या दैनंदिन गरजासुद्धा समाजातूनच भागवतो. आणि म्हणूनच मनुष्य हा परस्परावलंबीसुद्धा आहे. समाजचं त्याला जगण्याचं भान देत असतो. आणि या सामाजिक परिस्थितीतचं तो जगण्याचा व्यवहार सुद्धा शिकत असतो. आणि म्हणूनच ज्या समाजात आपण घडतो, वावरतो त्या समाजाचे उत्तरदायित्व म्हणून तो समाज अखंड रहावा यासाठी माणसाला काही कर्तव्य पार पाडावी लागतात. आणि त्याच कर्तव्यांचा समावेश भारतीय संविधानिक मूलभूत कर्तव्य यात करण्यात आला. संविधानिक मूलभूत कर्तव्याच्या क्रमांक सहा मध्ये राष्ट्राच्या

सामाजिक,सांस्कृतिक गौरवशाली परंपरेचे रक्षण करणे या जबाबदारीचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

आपला भारत देश मुळातच संस्कृतीप्रधान देश आहे. ज्यात विविध जाती, धर्म, पंथ, वर्णाचे लोक गुण्यागोविंदाने नांदतात. त्यांच्या त्यांच्या विविध संस्कृतीचे जतन करतात आणि पुढच्या पिढीकडे ती सुपूर्तही करतात. मग ती संस्कृती आपल्याला वेगवेगळ्या स्वरूपांमध्ये पाहायला मिळते. कधी ती संस्कृती सणांच्या माध्यमातून दिसते तर कधी भाषेच्या माध्यमातून. कधी वेशभूषाच्या माध्यमातून दिसते तर कधी अगदी केशभूषेच्या माध्यमातूनही. काही ठिकाणी तर अगदी उत्साह, महत्व आणि भावना एकच पण नाव मात्र वेगवेगळे. आणि त्यातूनच त्या भागातील संस्कृतीचे दर्शन होते. म्हणजे अगदी महाराष्ट्रात मकर संक्रांत साजरी केली जाते. तर तोच सण दक्षिणेकडे पोंगल म्हणून साजरा केला जातो. पंजाबकडे याच सणाला लोहडी नाव आणि महत्त्व आहे. म्हणजेच काय तर विविध संस्कृती पण साचा मात्र एकच 'भारताचा '. भारतातील विविध राज्य प्रदेशातील संस्कृती ही भारताच्या वैभवशाली परंपरेचा एक दस्तऐवज आहे.

या देशाला सांस्कृतिक परंपरेचे महत्त्वसुद्धा अनन्यसाधारण आहे. गाणी,वाणी, नृत्य, खेळ इत्यादींमध्ये आढळणारी विविधता या देशाचे कैंद्रबिंदू आहे. त्याचे उदाहरण घ्यायचे झाले तर,आदिवासी समुदायातील 'तारपा हे 'नृत्य.हे नृत्य सांस्कृतिक विविधतेचे एक महत्त्वाचे प्रतीक आहे. निसर्गाला देव मानून निसर्गापासून मिळालेल्या वाद्यांद्वारे नाद निर्माण करत आपला एक विशिष्ट प्रकारचा नृत्य प्रकार आनंदाच्या मंगल प्रसंगी सादर करत आपल्या सांस्कृतिक परंपरेची श्रीमंती जगाला आदिवासी समुदाय आजही देतो आहे. त्याचबरोबर त्यांच्याच माध्यमातून रेखाटली जाणारी 'वारली 'चित्रकला ही सुद्धा जगाच्या पटलावरती एक महत्त्वाचं सांस्कृतिक उदाहरण म्हणून पहायला मिळते. आणि म्हणूनच भारतीय परंपरेचा मुखवटावरचा सांस्कृतिक विविधता हा एक शिरोमणीच आहे. आणि ही परंपरा आज जागतिक स्तरावर ती भारताचे गौरव म्हणून स्वीकारली जात आहे. आणि याचा एक भारतीय म्हणून आपणा सर्वांनाच अभिमान अधिक आनंद आहे.

भारत देशातील परंपरा अगदी सांस्कृतिक असो किंवा सामाजिक असो, या प्रत्येक परंपरेला अधिष्ठान आहे ते इथल्या एकतेचे आणि समतेचे. म्हणजे व्यक्ती व्यक्तीतील भेद विसरून , बंधनांच्या पलीकडे जाऊन या सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरा देशाचा सलोखा राखण्यास मदत करतात. शिवाय या जगाला भारत देशातील सुपीक जमिनीबरोबरच या जमिनीत राबणाऱ्या सुपीक डोक्यांनी आणि राबणाऱ्या हातांनी टिकवून ठेवलेली इथली संस्कृती.ही संस्कृती या देशाचा अलंकार

आहे.याची प्रचिती आपणास आल्यापासून राहत नाही. आज जगात भारत आपले स्वतःचे अस्तित्व निर्माण करत असताना भारतीय परंपरेचा आणि संस्कृतीचा गौरव जगात चहूमुलखी होत आहे. आणि हा गौरव अबाधित राहावा म्हणून भारतीय संविधानाने कर्तव्यांच्या माध्यमातून प्रत्येक भारतीयांवरती एक महत्त्वपूर्ण जबाबदारीच ठेवलेली आहे. ज्या जबाबदारीचे भान ठेवून यथार्थ पालन करणे व देशाच्या अखंडत्वासाठी कायम पोषक वातावरण निर्माण करणे हे एक भारतीय म्हणून आपले कर्तव्य आहे.

# पर्यावरण संरक्षण

## (मूलभूत कर्तव्य क्र.०७)

---

**श्रीमती प्रज्ञा धनंजय साळुंखे**

**हजेरी क्रमांक - ३९**

---

**“नुसतच म्हणतो धरणी माय**

**पण तिच्यासाठी करतो काय”**

या कवितेच्या ओळी आपण सगळ्यांनी केव्हा ना केव्हा जरूर ऐकल्या आहेत. ज्या धरणीवर अर्थातच पृथ्वीवर आपण राहतो, जी पृथ्वी आपल्याला कुशीत घेते त्या धरणेची अर्थातच त्या पृथ्वीची काळजी आपण घेतो का? हा यक्ष प्रश्न आपल्यासमोर उभा आहे. एकविसाव्या शतकातील मानवाने विकासाची गगन भरारी घेतली जरूर पण त्याचबरोबर त्यांनी एकीकडे या विकासाची शाश्वत किंमत सुद्धा भोगण्यास सुरुवात केली. आणि याची प्रचिती कदाचित फार पूर्वी लागली आणि म्हणूनच भारतीय संविधानाच्या मूलभूत कर्तव्यात पर्यावरणाचे संरक्षण या तत्त्वाचा अंतर्भाव करण्यात आला.

पृथ्वीवरील अथवा पृथ्वीच्या कोणत्याही प्रदेशातील मानव तसेच इतर सजीव ज्या परिसरात राहतात, त्या परिसरातील सर्व घटकसमूह मिळून तयार झालेली परिस्थिती म्हणजे पर्यावरण होय.सजीवांना त्यांच्या जीवनसंघर्षासाठी आणि उत्क्रांतीमध्ये सभोवालतच्या पर्यावरणाशी जुळवून घ्यावे लागते अथवा अनुकूल असे बदल करावे लागतात. जे सजीव आपल्यात बदल घडवून आणण्यात कमी पडतात किंवा काही कारणास्तव ते स्वतःमध्ये बदल घडवू शकत नाहीत ते नष्ट होतात. जो बदल स्वीकारतो तोच येथे तग धरून राहू शकतो. पर्यावरण आणि मानव यांचे परस्पर संबंध नेहमी बदलत असतात. पर्यावरणाचे रक्षण करणे सर्वांची जबाबदारी आहे. पर्यावरण संरक्षण प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

पृथ्वीवरील जीवन केवळ पर्यावरणामुळेच शक्य आहे, पर्यावरण हे प्रत्येकाच्या जीवनासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. पर्यावरणामध्ये सर्व लोक, सर्व प्राणी, निसर्गातील सर्व वनस्पती आणि झाडे तसेच हवामान आणि हवामान यांचा समावेश होतो. इकोसिस्टम केवळ तापमान संतुलित ठेवत नाही तर जीवनासाठी आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी देखील प्रदान करते.

दुसरीकडे, प्रगत तंत्रज्ञान असूनही आणि लक्षणीय जागतिक विकासास कारणीभूत असूनही पर्यावरण प्रदूषणाच्या वाढत्या पातळीसाठी विज्ञान देखील जबाबदार आहे. आधुनिकीकरण, औद्योगिकीकरण आणि तंत्रज्ञानाचा वाढता वापर यामुळे पर्यावरणाची हानी होत आहे.

माणूस स्वतःच्या स्वार्थापोटी झाडे नष्ट करतो आणि नैसर्गिक साधनसंपत्तीशी छेडछाड करतो, ज्याचा पर्यावरणावर विपरीत परिणाम होतो. तसेच, काही मानवनिर्मित घटकांमुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे, वातावरण, हायड्रोस्फियर इत्यादींवर परिणाम होत आहे आणि ग्लोबल वॉर्मिंग म्हणून ओळखली जाणारी समस्या उद्भवत आहे. हे मानवी आरोग्यासाठी अत्यंत धोकादायक आहे.

इतकेच नव्हे, तर जंगलांच्या संवर्धनासाठी वन्यप्राण्यांचे रक्षण करणे अत्यावश्यक आहे. 'वाघ' हा खरा जंगलचा राजा असल्याने, त्याची संख्या कशी वाढेल, याद्दष्टीने वनविभागाने ठोस उपाययोजना कराव्यात. जलप्रदूषण थांबविण्यासाठी औद्योगिक आस्थापनांद्वारे सोडले जाणारे केमिकलयुक्त पाणी नद्या, खाड्या, समुद्राच्या पाण्यात मिसळणार नाही, यासाठी राज्याचा उद्योग विभाग आणि राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने कठोर निर्बंध लादावेत. जेणेकरून जलप्रदूषणास आळा बसू शकेल.'आपणही जगा अन् इतरांनाही जगू द्या' हे ध्येय उराशी बाळगून नागरिकांनी आपले जीवन मार्गक्रमित करावे, म्हणजे पर्यावरणाचे संवर्धन होऊन 'वसुंधरा बचाव' लोकचळवळ यशस्वी होऊ शकेल.

## मानवतावाद आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांची सांगड

## (मूलभूत कर्तव्य क्रमांक ८)

---

**श्रीमती कोमल केशव तिवरेकर**

**हजेरी क्रमांक ४४**

---

मानवतावाद ही एक लोकशाही आणि नैतिक जीवनशैली आहे, जी पुष्टी करते की मानवांना त्यांच्या स्वतःच्या जीवनाला अर्थ आणि आकार देण्याचा अधिकार आणि जबाबदारी आहे. मानवी क्षमतांद्वारे तर्क आणि मुक्त चौकशीच्या भावनेने मानवी आणि इतर नैसर्गिक मूल्यांवर आधारित नैतिकतेद्वारे अधिक मानवी समाजाची उभारणी केली जाते. हे आस्तिक नाही, आणि ते वास्तविकतेची अलौकिक दृश्ये स्वीकारत नाही. मानवतावाद हा विश्वाच्या आकलनात निसर्गवादी आहे; विज्ञान आणि विनामूल्य चौकशी आपल्याला विश्वाबद्दल अधिक समजून घेण्यास मदत करेल.हा वैज्ञानिक दृष्टिकोन माणसाला माणसांपेक्षा कमी करत नाही.मानवतावादी स्वयं-परिभाषित, अर्थपूर्ण आणि आनंदी जीवनाच्या शोधाला महत्त्व देतात.मानवतावाद नैतिक आहे; नैतिकता हा मानवांसाठी त्यांचे जीवन सुधारण्याचा एक मार्ग आहे.मानवतावादी वैयक्तिक आणि सामाजिक परिस्थिती सुधारण्यासाठी व्यावहारिक कृती करतात.

'विज्ञान' हा आजकाल परवलीचा शब्द आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन हा तयार व्हावा लागतो. मुलांमधे तो रुजविण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतात. वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण झाल्याने अनेक फायदे होतात. तसेच विविध मूल्ये रुजविली जातात. विज्ञान शिकण्याची आवश्यकता तसेच वैज्ञानिक दृष्टिकोन तयार झाल्याने होणारे फायदे व मूल्ये कोणती याची सविस्तर मीमांसा येथे दिली आहे.एकविसावे शतक हे जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरणाचे आहे. या बरोबर माहिती तंत्रज्ञानाचे आहे, हे निर्विवाद सत्य आहे. आज माहितीचा प्रचंड विस्फोट झालेला आहे. मागील शतकात जेवढा बदल झाला नाही तेवढा बदल या दशकात झाला आहे. या बदलांना जुळवून घेणारा विद्यार्थी तयार करणे, हे शिक्षकांपुढील आव्हान आहे. काल घेतलेले ज्ञान आज कालबाह्य होत आहे. या तंत्रज्ञानाच्या वेगाशी जुळवून घेणारा विद्यार्थी शिक्षकांना तयार करावयाचा आहे. हा विद्यार्थी नीर क्षीर विवेकबुद्धीने वागणारा घडला पाहिजे. त्यासाठी शिक्षकांना स्वत:बरोबर विदयार्थ्यांमध्ये अनेक मूल्यांची पेरणी करावी लागणार आहे. त्यातील सर्वांत महत्त्वाचे मूल्य म्हणजे

वैज्ञानिक दृष्टिकोन हे होय. हा दृष्टिकोन निर्माण होतो विज्ञान विषयातून विज्ञान हा सर्व शास्त्रांचा पाया आहे. जगाच्या विकासाचा, शाश्वत सुखाचा व कल्याणाचा मार्ग म्हणजे विज्ञानाची कास धरून प्रगती साधणे हा होय. विज्ञानाचे महत्त्व अधोरेखित करताना प्रसिद्ध भारतीय शास्त्रज्ञ डॉ. वसंत गोवारीकर म्हणतात, आज काळ आणि वेग या संकल्पना संकुचित होत आहेत.त्यासाठी शाळा स्तरावरील विज्ञान विषयाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.त्या शोधामुळे मानवी जीवनात झालेले परिवर्तन याची माहिती विदयार्थ्यांना करून दिल्यामुळे त्यांच्यामध्ये कुतूहल, जिज्ञासा व प्रेरणा निर्माण होईल त्यावेळी म्हणता येईल,

**'जिज्ञासा होई पूर्ती । कर्तव्याची जाण चित्ती । |**

**स्मृती या छात्रा देती स्फूर्ती । चैतन्याची मिळते शक्ती।।**

त्यामुळे विदयार्थ्यांमध्ये वैज्ञानिक जाणिवा प्रगल्भ होण्यास मदत होते. बुवाबाजी, अंगात येणे यासारख्या सामाजिक समस्यांमागील विज्ञान विद्यार्थ्यांना शिक्षकांनी समजावून सांगावे, त्यामुळे निकोप मानसिकता वाढीस लागेल. प्रत्येक गोष्ट विज्ञानाच्या कसोटीवर तपासण्याची सवय लागेल. विदयार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होईल. त्यामुळे चौकसपणा आणि तर्कशुद्ध विचारांना चालना मिळेल. अंधश्रद्धेवर आधारित भाकड विचारांवर मात करता येईल. त्यासाठी शिक्षकांनी उपक्रमांची आखणी प्रसंगानुरूप व जाणीवपूर्वक केली पाहिजे.

प्राचीन भारतीय परंपरेत 14 विद्या आणि 64 कलांचा उल्लेख आढळतो. अंतरिक्ष, सूर्य, चंद्र, गिरीशिखरे, नदी, नाले, सरोवरे, जंगले, कृमी, कीटक, पशू, पक्षी आणि मनुष्य यांनी संपृक्त असलेला हा निसर्गच इतका विशाल आणि व्यापक आहे की सृष्टीतील एकेका अंगाचा जरी सखोल अभ्यास करावयाचा झाल्यास एकच काय अनेक जन्मही पुरणार नही. या सृष्टीतील एका वस्तुचा म्हणजेच व्यष्टिचा अभ्यास करावयाचा ठरविल्यास तो एकेक घटकच इतका व्यामिश्र आणि गुंतागुंतीचा असतो की त्यातील अवघी सूक्ष्मता आकलन होणे भल्याभल्यांनाही दुरापास्त ठरते.अनेक मानवसमूह एकत्र येऊन बनलेल्या समष्टीचा विचार करू लागल्यास त्या समष्टीच्या रचनेमागचे गतीतत्व इतक्या घटकांनी निहीत असते की ते समजण्यासाठी उभा जन्मही अपुरा ठरू शकतो.ज्ञान, विज्ञान आणि प्रज्ञान असं वर्गीकरण जर केलं तर ज्ञान ज्याला इंग्रजीत नॉलेज म्हणतात ते म्हणजे आपल्या सभोवताली असलेल्या असंख्य विषयाची माहिती होय. यालाच आपण सामान्य ज्ञान असेही म्हणतो. विज्ञान म्हणजे विशेष ज्ञान होय. एखाद्या वैज्ञानिकाने किंवा जिज्ञासूने विशिष्ट पद्धतीचा अवलंब करून प्रयोग शाळेत निरीक्षण आणि प्रयोग करून प्राप्त केलेले ज्ञान म्हणजे विज्ञान होय. अनेक कृत्रिम उपकरणाचे साह्य घेऊन जेव्हा हे ज्ञान अचूक आणि काटेकोर करण्याचा प्रयत्न केला जातो तेव्हा त्यांस तंत्रज्ञान असे म्हणतात.

मानवी प्रज्ञेच्या कक्षा कितीही रुंदावता येतात. मनुष्य जाणिवेचे अनेक तरल स्तर असतात. तरलतेच्या सर्वोच् स्तरावर होणाऱ्या समग्र एकसंध, एकरस ज्ञानालाच प्रज्ञान म्हणतात. जे जाणले म्हणजे अन्य कांहीच जाणण्याचे उरत नाही ते ज्ञान म्हणजेच प्रज्ञान होय. हे प्राप्त करण्यासाठी अंगभूत प्रतिभा, सूक्ष्म आकलनशक्ती आणि जन्मोजन्मीच्या पुण्याईची आवश्यकता असते. एकूण ज्ञानाचा सागर अथांग आहे. ज्ञानार्जन करणाऱ्याची ओंजळ किती व्यापक आणि सूक्ष्म आहे, हाच मुख्य प्रश्न आहे.

हे असे आठवे मूलभूत कर्तव्य भारतीय संविधानातील वैज्ञानिक दृष्टिकोन व मानवतावाद यांची उत्तम सांगड घालून देत आहेत.

## सार्वजनिक संपत्तीचे संरक्षण करून अहिंसात्मक वर्तन करणे.

## (मूलभूत कर्तव्य क्रमांक ०९)

---------------------------------------------------------------------------------------------------

**श्रीमती प्रतिज्ञा मोहन कोडग**

**हजेरी क्रमांक १७**

---------------------------------------------------------------------------------------------------

सरकारी किंवा सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होऊ नये यासाठी आमचा प्रयत्न असायला हवा. त्याचे नुकसान म्हणजे आपण आपलेच नुकसान करत आहोत. सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे आणि हिंसाचारापासून दूर राहणे हेही आपले मूलभूत कर्तव्य आहे.

कोणतीही इमारत किंवा मालमत्ता जी पाणी, प्रकाश, वीज किंवा ऊर्जा उत्पादन किंवा वितरणासाठी वापरली जाते ती सार्वजनिक मालमत्ता मानली जाते. याशिवाय कोणतीही तेलाची प्रतिष्ठापना, सीवरेज खाण किंवा कारखाना किंवा कोणतीही सार्वजनिक वाहतूक किंवा दूरसंचार साधनेही सार्वजनिक मालमत्तेच्या अंतर्गत येतात. आपण सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण केले पाहिजे आणि हिंसाचारापासून दूर राहिले पाहिजे. बस, इमारत इत्यादी सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करण्याचा कोणी प्रयत्न केल्यास त्याला रोखावे. सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे हे आपले मूलभूत कर्तव्य आहे.

सरकारी मालमत्तेचे नुकसान म्हणजे स्वतःचे नुकसान कोणत्याही परिस्थितीत, सरकारी किंवा सार्वजनिक मालमत्तेचे कोणतेही नुकसान होणार नाही याची काळजी घेण्याचा आमचा प्रयत्न असावा. त्याचे नुकसान म्हणजे आपण आपलेच नुकसान करत आहोत. सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे आणि हिंसाचारापासून दूर राहणे हेही आपले मूलभूत कर्तव्य आहे. वैयक्तिक आणि सामूहिक क्रियाकलापांच्या सर्व क्षेत्रात उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करा जेणेकरून राष्ट्र नेहमीच उच्च पातळी गाठेल. राज्यघटनेची शपथ ही केवळ नेत्यांची नसून तुम्ही आणि मीही एकाच कक्षेत आहोत. भारतीय संविधानानुसार आपली कर्तव्ये जाणून घेणे आपल्यासाठी महत्त्वाचे आहे. हे नेहमीच हक्कांबद्दल असते. अनेकदा हक्कांची मागणी आणि त्यासंबंधीच्या बाबी चर्चेत राहतात. सरकार, पोलिस, प्रशासन इत्यादींवर नेहमीच दबाव असतो की, अशांच्या अधिकारांची पायमल्ली केली

जात आहे किंवा अधिकारांपासून वंचित ठेवले जात आहे, परंतु तुम्ही कधी हक्कांसारख्या कर्तव्यांबद्दल ऐकले आहे का?

आपले कर्तव्य आहे, हे कर्तव्य आपण सर्व परिस्थितीत निभावले पाहिजे, असे नागरिकांनी सांगितले पाहिजे. असे नाही. ज्या गांभीर्याने अधिकारांबद्दल बोलले जाते त्याच गांभीर्याने कर्तव्ये ऐकली जात नाहीत, तर संविधानात दोन्ही गोष्टी एकमेकांना पूरक आहेत. अधिकार कुठे आहे? तिथेही कर्तव्य असते. त्यामुळे आपल्या कर्तव्याची माहिती असणे आपल्यासाठी महत्त्वाचे आहे. आपल्या राज्यघटनेनुसार हक्क आणि कर्तव्ये यांचा परस्परावलंबी संबंध आहे. म्हणजे एकाची दुसऱ्याशिवाय कल्पनाही करता येत नाही. जिथे कर्तव्य आहे तिथे अधिकार आहेत. राज्यघटनेत बघितले तर अधिकारांसोबत कर्तव्येही जोडली गेली आहेत, ज्याची आपल्याला जाणीव असायला हवी आणि त्यानुसार कर्तव्य बजावले पाहिजे. नागरिकत्व कायद्यामुळे झालेल्या हिंसाचाराबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, उत्तर प्रदेशमधील लोकांनी ज्या प्रकारे हिंसाचाराद्वारे मालमत्तेची नासधूस केली, त्यांनी घरात बसून विचार केला पाहिजे की ते योग्य होते का? यासाठी त्यांनी आत्मपरीक्षण करावे. ते म्हणाले की, सरकारी मालमत्तेची तोडफोड करणाऱ्यांना मी सांगू इच्छितो की, जर चांगले रस्ते, उत्तम वाहतूक व्यवस्था, उत्तम सीवर लाईन हा नागरिकांचा हक्क असेल तर त्यांना सुरक्षित आणि स्वच्छ ठेवणेही त्यांचे कर्तव्य आहे. आपण अनेकदा सरकारी सुविधांवर टीका करतो जी चुकीची आहे.

आपल्या देशात उपलब्ध असलेल्या सरकारी सुविधांवर आपण टीका करत असल्याचे अनेकदा दिसून येते. सरकारी यंत्रणेला वाईट आणि वाईट म्हटले जाते. इतर देशांच्या तुलनेत आपण आपल्या देशाचे वजन करतो. देशाच्या जडणघडणीत त्यांचे काय योगदान आहे, याचा कधी कोणी विचार केला आहे का? तुम्हाला मिळालेल्या सुविधांचा तुम्ही आदर करता का? एखाद्या व्यक्तीने भरलेला कर स्वतःच्या सोयींवर खर्च होतो हेही त्यांना माहीत नाही. अशा परिस्थितीत लोक प्रामाणिकपणे कर भरतात की नाही हे महत्त्वाचे ठरते? त्यामुळे सार्वजनिक मालमत्ता ही आपली संपत्ती समजून तिचा वापर केला पाहिजे. कोणत्याही चांगल्या गोष्टीची सुरुवात स्वतःपासून व्हायला हवी. हे ज्ञान आजच्या पिढीला द्यायला हवे. त्यामुळे आपल्या देशाचीही विकसित देशांमध्ये गणना होईल.

# राष्ट्राच्या उत्तरोत्तर प्रगतीसाठी सामूहिक उत्कर्ष साधणे

## (मूलभूत कर्तव्य क्रमांक १०)

---

**श्रीमती सावित्री नथू महाले**

**हजेरी क्रमांक २२**

---

व्यक्ती ही राष्ट्राची संपत्ती आहे. आणि व्यक्तीला सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक स्थैर्य प्राप्त करून देणे ही राष्ट्राची जबाबदारी आहे. परंतु ही राष्ट्राची जबाबदारी ही व्यक्तीच्या सर्वांगीण विकासावर ती अवलंबून असते. आणि व्यक्तीची प्रगती ही तेव्हाच होऊ शकते जेव्हा त्या राष्ट्रातील शासन व्यवस्था व्यक्तीच्या प्रगतीसाठी पोषक वातावरण निर्माण करते. आणि म्हणूनच व्यक्तीच्या प्रगतीसाठी राष्ट्र आणि राष्ट्राच्या प्रगतीसाठी व्यक्ती हा परस्परावलंबी पूल साधने अत्यंत गरजेचे आहे. आणि याचेच उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून भारतीय संविधानातील मूलभूत कर्तव्य राष्ट्राच्या उत्तरोत्तर प्रगतीसाठी व्यक्तिगत आणि सामूहिक उत्कर्ष साधने हे तत्व बहाल करते.

एखाद्या राष्ट्राचा विकास केव्हा होतो याची काही परिमाणे निश्चित केलेली आहेत. आणि या परिमाणांचा जेव्हा आपण विचार करतो त्यावेळेस त्या राष्ट्रातील युवा, स्त्रिया, शेतकरी,कष्टकरी आणि या सर्वांचा समूह यांचा विकास साधने अत्यंत गरजेचे ठरते. ज्यावेळेस देशातील हे सर्व घटक समाधानी आणि प्रगतिशील असतात तेव्हा त्या देशाचा विकासही झाला आहे,असे निश्चितपणे म्हणता येईल. सोन्याचा धूर निघणारा भारत देश होता असं म्हटलं जायचं. परंतु कालांतराने या देशातच गरिबीचे, दारिद्र्य प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले. आणि यातूनच प्रत्येक सूक्ष्मातील सूक्ष्म समूहातील व्यक्तीचा विकास होणे या देशाची प्राथमिक गरज ठरू लागली. आणि म्हणूनच भारतीय संविधान प्रत्येक व्यक्तीसाठी समान संधी बहाल करण्याचे काम करते.

मानवाच्या मूलभूत गरजांचा विचार करत असता आपल्या लक्षात येते की अन्न, वस्त्र आणि निवारा या तीन घरचा भागल्या की माणूस आपल्या आयुष्य जगू शकत होता. परंतु कालांतराने मानवाच्या विकासाचे निकष बदलत राहिले आणि परिवर्तनानुसार या मूलभूत गरजांमध्ये सुद्धा वाढ होत गेली. आणि आता आरोग्य आणि शिक्षण या दोन मूलभूत गरजांची सुद्धा भर त्यात

पडली आहे. ज्या देशातील लोक या पाच मूलभूत गरजा सहजपणे पूर्ण करू शकत असतील तो देश विकसित देश आहे असे ढोबळमानाने आपल्याला म्हणता येईल. परंतु जो देश अद्यापही या पाच मूलभूत गरजांची पूर्तता करू शकत नाही तो देश अविकसित देशाच्याच रांगेत उभा आहे असे आपल्याला म्हणता येईल. आणि म्हणूनच देशाचा विकास हा उत्तरोत्तर होत राहावा. आणि त्यातूनच देश महासत्ताक बनावा यासाठी भारतीय संविधान मूलभूत कर्तव्यामध्ये व्यक्तिगत आणि सामूहिक उत्कर्ष साधनेची जबाबदारी भारतीयांवर देते.

व्यक्तीच्या प्राथमिक मूलभूत गरजा भागल्या की व्यक्तीने समाजाचे उत्तरदायित्व म्हणून समाजासाठी कार्य करावे आणि आपल्या सोबत इतरांचाही विकास होण्यास मदत करावी ही एक माफक अपेक्षा कर्तव्यांच्या स्वरूपात आपल्यासमोर आलेली पाहायला मिळते. कारण माणूस हा मुळातच समाजप्रिय प्राणी आहे. त्यामुळे व्यक्तिगत उत्कर्षासाठी सामाजिक उत्कर्ष साधने हे अनन्यसाधारण ठरते. आणि त्याद्वारे मूलभूत कर्तव्य आपणास मार्गदर्शक तत्त्वांच्या स्वरूपात महत्त्वपूर्ण ठरतात. ज्यावेळेस देशातील व्यक्ती आणि व्यक्तींचा समूह यांच्या प्रगतीचा आलेख एकत्रपणे चालेल त्यावेळेस देशात खऱ्या अर्थाने व्यक्ती आणि व्यक्तीसमूह दोन्ही सुखी आहेत आणि देशाचा विकास होतो आहे असे मानण्यास हरकत नाही.

# ६ ते १४ वयोगट बालकांना मोफत शिक्षण

## (मूलभूत कर्तव्य क्र.११)

---

**श्रीमती तेजल प्रविण कलाल.**

**हजेरी क्र:- १५**

---

राज्यघटना (80 वी दुरुस्ती) अधिनियम, २००२ ने भारतीय राज्यघटनेत सहा ते चौदा वर्षे वयोगटातील सर्व बालकांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण हा मूलभूत हक्क म्हणून राज्याच्या रीतीने प्रदान करण्यासाठी कलम २१-अ समाविष्ट केले. कायद्याने ठरवू शकते. बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार (RTE) कायदा, 2009, जो कलम 21-A अंतर्गत परिकल्पित केलेल्या परिणामी कायद्याचे प्रतिनिधित्व करतो, याचा अर्थ असा आहे की प्रत्येक मुलाला औपचारिक शाळेत समाधानकारक आणि न्याय्य गुणवत्तेचे पूर्णवेळ प्राथमिक शिक्षण मिळण्याचा अधिकार आहे. काही अत्यावश्यक नियम आणि मानके पूर्ण करते.

कलम 21-A आणि RTE कायदा 1 एप्रिल 2010 रोजी अंमलात आला. RTE कायद्याच्या शीर्षकामध्ये 'मुक्त आणि अनिवार्य' हे शब्द समाविष्ट आहेत. 'मोफत शिक्षण' याचा अर्थ असा आहे की, त्याच्या पालकांनी योग्य सरकारद्वारे समर्थित नसलेल्या शाळेत प्रवेश घेतलेल्या मुलाशिवाय इतर कोणतेही मूल, कोणत्याही प्रकारचे शुल्क किंवा शुल्क किंवा खर्च देण्यास जबाबदार असणार नाही ज्यामुळे प्रतिबंध होऊ शकेल. त्याला किंवा तिला प्राथमिक शिक्षण घेण्यापासून आणि पूर्ण करण्यापासून. 'अनिवार्य शिक्षण' 6-14 वयोगटातील सर्व मुलांसाठी प्रवेश, उपस्थिती आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण करणे आणि ते सुनिश्चित करणे हे योग्य सरकार आणि स्थानिक प्राधिकरणांवर बंधनकारक आहे. यासह, भारत एका हक्कावर आधारित चौकटीकडे पुढे गेला आहे जो RTE कायद्याच्या तरतुदींनुसार, घटनेच्या कलम 21A मध्ये अंतर्भूत केलेल्या या मूलभूत बाल अधिकाराची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारांवर कायदेशीर बंधन घालते.

आरटीई कायदा :-शेजारच्या शाळेत प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत मुलांना मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार.

हे स्पष्ट करते की 'सक्तीचे शिक्षण' म्हणजे मोफत प्राथमिक शिक्षण देणे आणि सहा ते चौदा वयोगटातील प्रत्येक मुलास अनिवार्य प्रवेश, उपस्थिती आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण करणे सुनिश्चित करणे योग्य सरकारचे बंधन आहे. 'मोफत' याचा अर्थ असा आहे की कोणत्याही मुलाला कोणत्याही प्रकारचे शुल्क किंवा शुल्क किंवा खर्च देण्यास जबाबदार असणार नाही ज्यामुळे त्याला किंवा तिला प्राथमिक शिक्षण घेण्यापासून आणि पूर्ण करण्यापासून रोखता येईल.

प्रवेश न मिळालेल्या मुलासाठी वयानुसार वर्गात प्रवेश देण्याची तरतूद त्यात आहे.

हे मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्यासाठी योग्य सरकारे, स्थानिक प्राधिकरण आणि पालकांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या निर्दिष्ट करते आणि केंद्र आणि राज्य सरकारांमध्ये आर्थिक आणि इतर जबाबदाऱ्यांचे वाटप करतात.

हे विद्यार्थी शिक्षक गुणोत्तर (PTR), इमारती आणि पायाभूत सुविधा, शाळा-कामाचे दिवस, शिक्षक-कामाचे तास यांच्याशी संबंधित निकष आणि मानके घालते.

हे सुनिश्चित करून शिक्षकांच्या तर्कसंगत नियुक्तीची तरतूद करते की प्रत्येक शाळेसाठी निर्दिष्ट विद्यार्थी शिक्षक गुणोत्तर राखले जाते, केवळ राज्य किंवा जिल्हा किंवा गटासाठी सरासरी म्हणून न ठेवता, अशा प्रकारे शिक्षकांच्या नियुक्तीमध्ये शहरी-ग्रामीण असमतोल नाही याची खात्री केली जाते. दशवार्षिक जनगणना, स्थानिक प्राधिकरणाच्या निवडणुका, राज्य विधानमंडळे आणि संसदेच्या निवडणुका आणि आपत्ती निवारण याशिवाय बिगर-शैक्षणिक कामांसाठी शिक्षकांच्या नियुक्तीवर बंदी घालण्याची तरतूद यात आहे.

यात योग्य प्रशिक्षित शिक्षकांची नियुक्ती करण्याची तरतूद आहे, म्हणजे आवश्यक प्रवेश आणि शैक्षणिक पात्रता असलेले शिक्षक.

हे प्रतिबंधित करते (अ) शारीरिक शिक्षा आणि मानसिक छळ; (b) मुलांच्या प्रवेशासाठी तपासणी प्रक्रिया; (c) कॅपिटेशन फी; (ड) शिक्षकांकडून खाजगी शिकवणी आणि (ई) मान्यता नसताना शाळा चालवणे,

हे संविधानात अंतर्भूत असलेल्या मूल्यांशी सुसंगत अभ्यासक्रमाच्या विकासाची तरतूद करते आणि ज्यामुळे मुलाचा सर्वांगीण विकास होईल, मुलाचे ज्ञान, क्षमता आणि प्रतिभा विकसित होईल आणि

मुलाला भीती, आघात आणि चिंता यापासून मुक्त होईल. मुलांसाठी अनुकूल आणि बाल केंद्रीत शिक्षणाची प्रणाली.


CONSTITUTION
OF
INDIA